# K.P.C. PUBLIC SCHOOL, KHARGHAR
## ASSESSMENT I -2023-24

**Grade: VII** **Marks- 40**
**Subject- Marathi** **Time :2Hours**

विभाग -अ

**प्र.१) खालील उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.** **(७)**

मे महिन्याची सुट्टी संपून मी परत दापोलीस शिकावयास गेलो. शाळा सुरू झाली. पावसाळाही सुरू झाला. तप्त जमिनीला मेघ शांतवू लागले. तापलेल्या जमिनीवर पाणी पडे व कसा सुंदर वास सुटे. नवीनच पाऊस जेव्हा सुरू होतो, तेव्हा मातीचा एक रम्य सुंदर वास सुटत असतो. 'गंधवती पृथ्वी' या वचनाची त्या वेळेस आठवण येते. फुलाफळांत जो रस, जो गंध असतो, एक प्रकारचा स्वाद असतो तो पृथ्वीच्याच पोटातला.

घरून दापोलीस येताना या वेळेस मी एक निश्चय करून आलो होतो. सुट्टीत घरी असताना एके दिवशी लहान भाऊ नवीन सदऱ्यासाठी हट्ट धरून बसला होता. त्या वेळेस त्याची समजूत घालताना आई म्हणाली, "तुझे अण्णा-दादा मोठे होतील, रोजगारी होतील, मग तुला सहा महिन्यांनी नवीन सदरा शिवतील. आता नको हट्ट धरू." मित्रांनो, माझ्या लहानपणी कपड्यांचे बंड फार माजले नव्हते. आम्हांला कोट माहीतच नव्हता. कित्येकदा सदराही वर्षा-दोन वर्षांनी नवीन मिळावयाचा. थंडीच्या दिवसांत धोतर चौघडी करून गळ्याशी बांधून शाळेत जावयाचे. मफलर नव्हते, जाकिटे नव्हती, गरम कोट नव्हते.

**प्रश्न. आकृतीबंध पूर्ण करा.**

१) हट्ट धरून बसलेला -___________. (१)
२) पृथ्वीला दिलेले विशेषण -____________. (१)
३) श्यामला थंडीच्या दिवसात न मिळणाऱ्या गोष्टी
१____________२___________३__________. (१,१/२)
४) कित्येकदा_______वर्षा दोन वर्षांनी नवीन मिळायचा.(रिकाम्या जागी योग्य शब्द भरा.) (१/२)
५) नवीन पाऊस सुरू होण्याचा मातीवर काय परिणाम होतो ?
(एका वाक्यात उत्तर लिहा.) (१)
६) स्वमत-गंधवती पृथ्वी म्हणजे काय? (२)

**प्र.१.ब) कवितेच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.** **(७)**

गहू शाळवाचं मोती काळ्या रानात सांडलं,
आणि माझ्या अंगणात लख्ख चांदणं पडलं ॥१॥
काळ्याशार मातीतुनी मोती-पवळ्याची रास,
अंगणात माझ्या डुले रानमेव्याची मिजास ||२||
दिला- घेतला वाढतो रानातला रानमेवा,
तुम्ही आम्ही सारेजण गुण्यागोविंदानं खावा ||३||
जीव दमतो, शिणतो घास भरवते माय,
घरामंदी घरट्यात जशी दुधातली साय ।।४।।

**प्र.१) आकृतीबंध पूर्ण करा.**

१) शेतात आलेल्या दोन धान्यांची नावे१)________२)_______ (१)

२) रानातला मेवा हे केल्याने वाढतो१)_______२)_______. (१)

३) कवीला घास भरवणारी ________ _ (१/२)

४) रानाचा रंग __________. (१/२)

५) एका वाक्यात उत्तरे लिहा. (२)

१) रानमेवा कुठे उगवला आहे?

२) कवीच्या अंगणात कशाकशाची रास पडते?

६) पुढील ओळींचा सरळ अर्थ लिहा. (२)

काळ्याशार मातीतुनी मोती-पवळ्याची रास,
अंगणात माझ्या डुले रानमेव्याची मिजास

**प्र.२) खालील अपठित गद्‌य वाचून सूचनेनुसार कृती करा. (६)**

कोलकाता शहरात देशभक्त आनंद मोहन यांनी स्त्रियांसाठी जी खास सभा बोलावली होती, ती भारतातील स्त्रियांची पहिली सभा होती. पंडिता रमाबाईना त्या वेळी बंगाली भाषा येत नव्हती. म्हणून त्यांनी मायबोलीसारखा सराव असलेल्या संस्कृत भाषेतून भाषण केले. बंगालीतून त्याचा अनुवाद त्या वेळी करण्यात आला. स्त्रियांची पहिली सभा, पहिली स्त्री वक्ता व सादर करण्यात आलेला पहिलाच मौखिक अनुवाद ही त्या सभेची वैशिष्ट्‌ये ठरली. स्त्रीला शिक्षणापासून वंचित ठेवले जात असताना, एक परप्रांतातील, परभाषकस्त्री महाभारतकालीन संदर्भ देऊन स्त्रियांच्या सभेत प्रबोधन करते. ही घटनाच फार आगळीवेगळी होती. आई, वडील व बंधू यांच्या निधनानंतर एकटे जगणे किती कठीण आहे. हे अनुभवल्यावर रमाबाईंनी विवाह करण्याचे ठरवले. अतिशय विद्‌वान वकील म्हणून ख्याती असलेल्या बिपिनबिहारी मेधावी यांच्याशी त्या रितसर विवाहबद्‌ध झाल्या. त्या वेळी त्यांचे वय बावीस वर्षांचे म्हणजे त्या वेळीच्या रुढींच्या दृष्टीने फारच वाढलेले होते.

प्र (१) आकृतिबंध पूर्ण करा. (२)

१) स्त्रियांसाठी खास सभा या शहरात भरवण्यात आली_______

२) या उताऱ्यात कोणत्या स्त्री विषयी माहिती आली आहे__________

(२) एका वाक्यात उत्तर लिहा.

१) पंडिता रमाबाईंच्या पतीचे नाव काय होते? (१)

(३) चौकट पूर्ण करा.

१)पंडिता रमाबाईंनी या भाषेत भाषण केले -______. (१)

(४) स्वमत: स्त्रियांसाठी कार्य करणाऱ्या पंडिता रमाबाई या समाजसुधारका विषयी माहिती उताऱ्याच्या आधारे लिहा माहिती लिहा. (२).

**विभाग -ब**

प्र.३) सूचनेनुसार कृती करा.

१) समानार्थी शब्द लिहा. १) मिजास- २) नदी - (२)

२) विरुद्‌धार्थी शब्द लिहा. १) सापडणे × २) जुना× (२)

३) वचन बदला. १) मोती- २) सडे - (२)

**४) खालील वाक्यातील नाम ओळखा.** **(२)**

१) आकाशात अचानक काळे ढग आले.

२) गुढीपाडवा हा सण आहे.

**५) खालील अधोरेखित शब्दाची जात ओळखा. (कोणतेही दोन)** **(२)**

१) ते आपल्याला फळे फुले **देतात**.

२) **नवीन** शाळेची गंमत वेगळी आहे.

३) **बागेत** मोफत वाचनालय आहे.

**विभाग -क**

प्र.४) खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर निबंध लेखन करा. (६)

१). शेतकरी व शेतकऱ्यांचे जीवन   २) साने गुरुजी

ब. खालील चित्र पाहून त्या विषयावर १०० ते १५० चित्र वर्णन करा. (४)

